:: प्रसिध्दी पत्रक :: दिनांक 31 / 12 / 2025

आरोपी– 1) दादासाहेब तेजराव यदमल (जोशी ) वय 36 वर्ष व्यवसाय नौकरी वनरक्षक, वन परिक्षेत्र कार्यालय पाटोदा. जिल्हा बीड., रा. भगवानबाबा चौक, मित्र नगर, कॅनोल रोड बीड. (वर्ग–3) 2) दिगांबर गणेश चौधरी य 34 वर्ष व्यवसाय मजुरी रा. आदर्श गणेश नगर, नगर रोड बीड. ह. मु. हॉटेल शिवरत्न रायमोहा ता. शिरुर जि. बीड. (खाजगी इसम)यांना 1,000 हजार रुपये (एक हजार रुपये) लाचेची मागणी करून 1000 हजार रुपये लाचेची मागणी करून स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांच्याकडुन कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिंध्बाक विभाग | बीड |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पाटोदा पोलीस ठाणे, जिल्हा बीड. |
| आरोपीचे नांव व कार्यालय पत्ता | 1) दादासाहेब तेजराव यदमल (जोशी ) वय 36 वर्ष व्यवसाय नौकरी वनरक्षक, वन परिक्षेत्र कार्यालय पाटोदा. जिल्हा बीड., रा. भगवानबाबा चौक, मित्र नगर, कॅनोल रोड बीड. (वर्ग–3)<br>2) दिगांबर गणेश चौधरी य 34 वर्ष व्यवसाय मजुरी रा. आदर्श गणेश नगर, नगर रोड बीड. ह. मु. हॉटेल शिवरत्न रायमोहा ता. शिरुर जि. बीड. (खाजगी इसम) |
| **लाच मागणी व स्विकारलेली रक्कम** | 1,000 / रु (एक हजार रूपये) लाच मागणी करून 1,000 / रु लाच रक्कम खा.इ. चौधरी करवी स्विकारण्याचे मान्य केले. |
| **सापळा अधिकारी** | पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड. |
| **लाच मागण्याचा हेतु** | दिनांक 31.12.2025 रोजी मुळ तक्रारदार यांनी श्री. संत ज्ञानेश्वर आश्रम रायमोह शिवार येथे तक्रार सांगीतली की, मी व माझा चुलत भाऊ बाभळीचे, सुबाभळीचे झाडे शेतकऱ्याकडुन पैसे देवुन विकत घेवुन लेबरने तोडुन त्याची आमचे पिक अप मधुन एम.आय.डी.सी. येथील लाकडी अड्यावर आणुन बारीक तुकडे करुन ते जळण म्हणुन अंत्यवीधी, हॉटेलला व घरगुती जळणासाठी विक्री करतोत. शेतकऱ्याकडुन विकत घेतलेले बाभळीच्या लाकडाचे पीक अप मधुन वाहतुक करण्यासाठी श्री. यदमल वनरक्षक हे 10,000रु– रुपये लाच मागणी करत आहेत. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी श्री. संत ज्ञानेश्वर आश्रम रायमोह शिवार येथे तक्रार दिली |
| **थोडक्यात माहिती** | दिनांक 31.12.2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी तक्रारदार व पंच क्र.1 यांना रायमोह येथे पाठवुन लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे श्री. यदमल व तक्रारदार यांची हॉटेल शिवरत्न, रायमोह येथे भेट झाली. भेटी दरम्यान कामासंदर्भाने चर्चा झाली त्यावेळी श्री. यदमल वनरक्षक यांनी जळण लाकडाची वाहतुक करण्यासाठी मासिक हप्ता 10,000रु/– रुपये अथवा प्रत्येक ट्रीप साठी 1000रु/– एक हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणाले असता तडजोडी अंती प्रत्येक ट्रीपसाठी 1000रु/– म्हणुन लाचेची मागणी करुन लाच रक्कम 1000रु/– श्री. दिगंबर चौधरी यांचे करवी स्विकारण्याचे मान्य केले.<br>सापळा कारवाई दिनांक 31.12.2025 रोजी तक्रारदार व पंच क्रमांक 1. यांना हॉटेल शिवरत्न रायमोह येथे श्री. दिगांबर रमेश चौधरी यांचेकडे पाठवुन सापळा कारवाई अजमावली असता लोकसेवक श्री. यदमल यांचे सांगण्यावरुन श्री. दिगांबर चौधरी हॉटेल कामगार यांनी 1000रु/– लाच रक्कम 16.00 वाजता हॉटेल शिवरत्न रायमोह येथे शासकीय पंचासमक्ष स्विकारुन आलोसे यदमल(जोशी) यांना फोन करुन लाच रक्कम 1000/.रु तकादारा कडून घेतल्याचे सांगितले असता खाजगी इसम नामे डिगांबर चौधरी यांना सापळा पथकाने ताब्यात घेऊन लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त केली. तसेच आलोसे तेजराव दादासाहेब यदमल (जोशी) वय 36 वर्ष व्यवसाय नौकरी वनरक्षक, वन परिक्षेत्र कार्यालय पाटोदा. जिल्हा बीड., रा. भगवानबाबा चौक, मित्र नगर, कॅनोल रोड बीड. (वर्ग–3) यांना ला. प्र. वि. बीड येथील पथकाने ताब्यात घेतले असुन त्यांचे विरुध्द आज दिनांक 31. 12.2025 रोजी पोलीस ठाणे पाटोदा जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, श्री. शशिकांत शिंगारे,अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले,पोनि.श्री.राहुलकुमार भोळ, पोनि.श्री.समाधान कवडे, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार, पांडुरंग काचगुंडे, अनिल शेळके, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, प्रदिप सुरवसे, सचिन काळे, बिभीषण सांगळे, अंबादास पुरी, गणेश म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड. |
| संकेतस्थळ | :– acbwebmail@mahapolice.gov.in |
| ई–मेल | :– 1 dyspacbbeed@mahapolice.gov.in |
| | :- 2 dyspacbbeed@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लिकेशन | :- acbmaharashtra.net |
| टोल फि कमांक | :– 1064 |
| दुरध्वनी कमांक | :– 02442–222649 |
| व्हॉटस अप क. | :– 9930997700 |
| पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर | :– 9011092777 |
| अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर | :– 9923102205 |
| पोलीस उप अधीक्षक,लापवि,बीड | :– 9270221064, 9518973185 |

(सोपान चिट्टमपल्ले)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.